**नमुना नं.२**

जा.क्र.जिपऔ/शिक्षण/प्राथि-३/२०१८-१९/ ७१०
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक :- 12/09/2019

**व्यवस्थापक :अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,**
**हॅप फाऊंडेशन औरंगाबाद संचलित**
**हॅप इंटर नॅशनल स्कुल, गट क्रं.५०८, चिकलठाणा**
**औरंगाबाद**

| | |
|---|---|
| **विषयः-** | **बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळा मान्यता प्रमाणपत्र बाबत...** |
| **संदर्भः-** | १)शासन मान्यता संकिर्ण-१९०९/प्र.क्रं.४३१/प्रा.शि-३ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २०आक्टोंबर २००९<br>२) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा ( स्थापना व विनियम (महाराष्ट्र शासन असाधारण क्रं. ४,६, व २४) २०१२.<br>३) शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१९/प्र.क्रं.५९२/एसएम-२ दिनांक २५ जुलै २०१९<br>४) शिक्षण विस्तार अधिकारी यांचा तपासणी अहवाल |

माननीय महोदय/महोदया

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी या आधारे. मी शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद औरंगाबाद **हॅप फाऊंडेशन औरंगाबाद संचलित हॅप इंटर नॅशनल स्कुल, गट क्रं.५०८, चिकलठाणा औरंगाबाद** या **इंग्रजी** माध्यमाच्या **(प्राथमिक ते उच्च माध्यमिक, १ ली ते १२ वी, सर्व शाखा, सी.बी.एस.ई.)** नवीन शाळेस सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षा पासुन स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्यात आलेली आहे. संदर्भीय शासन निर्णय,आदेश व तपासणी अहवालच्या अधीन राहुन बालकांचा मोफ्त व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ पोट नियम ४ नुसार **इयत्ता १ ली ते ८ वी च्या** मुळ वर्गास दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत मान्यता देण्यात येत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम,२००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे,शाळा पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकांतील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्ते,त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की,पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल,अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी,धर्म,जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाशी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही. चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास,नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच)विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल
(सहा)अधिनियमाच्या कलम २३(१)अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अनिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
(सात)अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील,आणि
(आठ)शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये,याची सुनिश्चिती शाळा करील. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
८. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील मागील तपासणीच्या वेळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या:

| | |
|---|---|
| शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | ३ एकर |
| एकुण बांधकाम क्षेत्र | ५४००० चौ. फुट |
| खेळाच्या मैदानाचे आहे काय? | आहे |
| वर्गखोल्यांची संख्या | १६ |
| कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली | ०४ |
| मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. | ३२+३२ |
| पिण्याच्या पाण्याची सुविधा | बोअर, टाकी- १३ |
| दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | |
| अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता | आहे |
| वाचन साहित्य विनायासास उपलब्ध. | आहे |

१०. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया,शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र,चालविता येणार नाहीत.

११. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासासच्या प्रयोजनार्थ वपरण्यात येतील.

१२. शाळा,सोसायटी नोंदणी अधिनियम,१८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम ,१९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१३. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या,गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या वा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१४. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१५. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक (                                        ) असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१६. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१७. संस्थेची नोंदणी कोणतेही असल्यास नूतणीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१८. जोडपत्र "तीन" नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

१९. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागली केलेले माध्यम,शाळेचे ठिकाण, इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.शासनाने ज्या ठिकाणी शाळा परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२०. तसेच नवीन शाळा स्थापन करणे बाबत देण्यात आलेल्या परवानगी शासन निर्णय व मा.शिक्षण उपसंचालक यांचे पत्रामधील नमुद अटी व शर्ती सुध्दा लागु राहतील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद औरंगाबाद

प्रतिलिपी

१. मा.शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांना माहितीस्तव सादर.

२. मा.शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद याना माहितीस्तव सादर.

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद,औरंगाबाद